महाराष्ट्र शासन

क्र. एसआरव्ही -२०१८/व्हीआयपी १५/प्र.क्र.८५/कार्या१२
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई - ४०००३२.
दूरध्वनी क्र.०२२-२२८४५१८७/२२०२६८२०
दिनांक : ५ मार्च, २०१८

प्रति,

अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व प्रशासकीय विभाग,
मंत्रालय, मुंबई

विषय : महिला अधिकारी/ कर्मचाऱ्यांना कार्यकारी पदांवर पदस्थापना देण्याबाबत.

प्रशासनातील काही कार्यकारी पदांवर महिलांना पदस्थापना देण्यात येत नाही, तर काही अकार्यकारी पदांवर केवळ महिला अधिकाऱ्यांचीच नेमणूक करण्यात येते. त्यामुळे महिला अधिकाऱ्यांमध्ये दुय्यमतेची भावना निर्माण होत असल्याने, याबाबत आढावा घेवून, कार्यकारी पदांवर महिलांना पदस्थापना मिळण्याबाबत शासन स्तरावरुन प्रयत्न केले जावेत अशी महिला अधिकारी/कर्मचाऱ्यांनी मागणी केली आहे.

२. शासकीय कार्यालयातील प्रत्येक संवर्गातील कार्यकारी पदे अथवा अकार्यकारी पदे निश्चित करण्याबाबत शासनाचे कोणतेही विवक्षित आदेश नाहीत. तथापि, विभागीय चौकशी/शिस्तभंगविषयक कार्यवाही करताना निलंबित शासकीय सेवकांना पुन:स्थापित करणेबाबतच्या सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन ११-अ च्या दि. २० एप्रिल २०१३ च्या शासन निर्णयान्वये सर्व विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभागातील अकार्यकारी पदे शोधून त्यांची यादी तयार करावी, अशा सूचना दिलेल्या आहेत. त्याअनुषंगाने, प्रशासकीय विभागांनी कार्यकारी/अकार्यकारी पदे निश्चित केलेली असतीलच. सदरची यादी व महिला अधिकारी /कर्मचाऱ्यांची उपरोक्त नमूद मागणी विचारात घेवून, सर्व प्रशासकीय विभागांना सूचना देण्यात येते की, बदल्या वा पदस्थापना करताना प्रशासकीय निकड लक्षात घेऊन, कार्यकारी पदांवर पदस्थापना देताना, महिला अधिकारी/कर्मचाऱ्यांचा देखील विचार करण्यात यावा.

३. सर्व प्रशासकीय विभागांनी उपरोक्त सूचना त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

४. सदर शासन पत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१८०३०५१७२३५७७५०७ असा आहे. हे पत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

Deepak Baliram More

Digitally signed by Deepak Baliram More
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7a0a9028f5cf4e8fcecf11939b538cdb87cae41919 92c32764673815b5778002, cn=Deepak Baliram More
Date: 2018.03.06 12:23:17 +05'30'

(दि.ब.मोरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

निवडनस्ती, सा.प्र.वि./कार्यासन १२